# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.05.2025** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली आज निती आयोगाच्या नियामक मंडळाची दहावी बैठक
2. पुर्वोत्तर राज्य उर्जा आणि सेमिकंडक्टर परिसंस्थेला नवी उर्जा देणारे स्त्रोत म्हणून उदयास येणार - पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. ऑपरेशन सिंदूरबद्दल भारताची भुमिका स्पष्ट करण्यासाठी दुसरं सर्वपक्षीय प्रतिनिधीमंडळ आज रवाना होणार आणि
4. दक्षिणेकडील राज्यात मुसळधार पावसाचा इशारा

**<u>नीती-आयोग</u>**

नीती आयोगाच्या नियामक मंडळाची दहावी बैठक आज नवी दिल्लीत होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील. '2047 मध्ये विकसित भारतासाठी विकसित राज्य अशी यावर्षीच्या बैठकीची मध्यवर्ती संकल्पना आहे. या बैठकीत विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री आणि उपराज्यपाल, केंद्रीय मंत्री आणि नीती आयोगाचे उपाध्यक्ष, सदस्य आणि मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. देशाचा विकास साधण्यासाठी कोणती आव्हाने आहेत आणि भारताला विकसित राष्ट्र बनवण्यात राज्यांची भूमिका काय असावी या विषयावर चर्चा अपेक्षित आहे. उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी, कौशल्य वाढविण्यासाठी आणि देशभरात शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी उपाययोजनांवरही बैठकीत चर्चा केली जाईल.

**<u>पंतप्रधान</u>**

ईशान्य भारत ऊर्जा आणि सेमीकंडक्टर क्षेत्रांचे केंद्र म्हणून उदयास येत आहे असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्ली इथं काढले. रायझिंग ईस्ट इन्व्हेस्टर्स परिषदेचे उद्घाटन करताना ते बोलत होते. केंद्र सरकार दहशतवाद किंवा अशांतता पसरवणारे नक्षलवादी अशा घटकांविरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबित असल्याचं ते म्हणाले. विकसित भारत निर्माण करण्यासाठी ईशान्य प्रदेशाचा विकास करणे महत्त्वाचे आहे. ईशान्य प्रदेशातील विविध क्षेत्रांतील उत्पादनाचे स्त्रोत शोधून ते कसे विकसित करता येतील याबाबत विचार करण्याचं आवाहन त्यांनी गुंतवणूकदारांना योवेळी केलं.

**<u>RBI</u>**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाने 2024-25 या आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारला एकंदर अडीच लाख कोटी रुपयांहून अधिक अतिरिक्त निधी हस्तांतरित करण्यास मान्यता दिली आहे. मुंबईत RBI गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत देशांतर्गत आणि जागतिक आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.

**<u>नक्षली</u>**

नक्षलवादविरोधात सुरक्षा दलांनी काल केलेल्या कारवाईत महाराष्ट्रात चार नक्षलवाद्यांना ठार करण्यात आलं आणि छत्तीसगडमध्ये 33 नक्षलींना आत्मसमर्पण केलं. महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यात, मुसळधार पावसात भामरागड जंगलात, छत्तीसगड सीमेजवळ संयुक्त कारवाई करण्यात आली. या चार नक्षलवाद्यांवर साडेतीन लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात

आलेलं होतं. अशी माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील बिनागुंडा इथून ताब्यात घेतलेल्या दोन नक्षलींना पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. विजापूरमध्ये 24 तर दंतेवाडा जिल्ह्यात काल 9 नक्षलींनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. अशी माहिती विजापूरचे पोलीस उपअधिक्षक जितेंद्र कुमार यादव यांनी. राज्य सरकारच्या पुनर्वसन धोरणांतर्गत सर्व आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांची प्रोत्साहन रक्कम देण्यात आली आहे. असंही पोलीसांनी सांगितलं.

## विमान-वाहतुक

विमान वाहतुकीसाठी असामान्य परिस्थितीची माहिती देणारी एक महत्त्वाची विमान वाहतूक सूचना किंवा संदेश देणारी यंत्रणा म्हणजे नोटम. या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानी विमानांसाठी जारी केलेल्या NOTAM ला पुढील महिन्याच्या 23 तारखेपर्यंत मुदतवाढ दिली आहे. अशी माहिती नागरी वाहतूक मंत्री किंजरापु राम मोहन नायडू यांनी नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना दिली. नागरी उड्डाण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानमध्ये नोंदणीकृत आणि पाकिस्तानी विमान कंपन्यांद्वारे चालवल्या जाणाऱ्या, सरकारी मालकीच्या आणि भाडेतत्त्वावर घेतलेल्या विमानांसाठी भारतीय हवाई क्षेत्र वाहतूकीसाठी बंद राहील, ज्यात लष्करी विमानांचाही समावेश आहे. असं ते म्हणाले

## सर्वपक्षीय प्रतिनिधी

ऑपरेशन सिंदूरबद्दल भारताची भुमिका स्पष्ट करण्यासाठी दुसरं सर्वपक्षीय प्रतिनिधी मंडळ आज रवाना होणार. काल परराष्ट्र व्यवहार सचिव विक्रम मिस्त्री यांनी याबद्दल सविस्तर माहिती दिली आणि भारताची दहशदवादाबाबतची कडक भूमिका जगासमोर मांडण्याबाबत मार्गदर्शन केल. यावेळी प्रतिनिधी मंडळात कॉंग्रेसनेते शशी थरूर, भाजप नेते रवीशंकर प्रसाद, बईजयंत पंडा, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे हे उपस्थित होते. या चर्चेबाबत अधिक माहिती देताना कॉंग्रेस नेते शशी थरूर यांनी सांगितल 1989 पासून भारत कशाप्रकारे अंतर्गत आणि बाह्य दहशदवादी करवायांना तोंड देत असून, भविष्यकाळातील या आव्हानांचा सामना कशा पद्धतीने करू शकेल यांची माहिती जगातील देशांना देण्यात येणार आहे. भारताची दहशदवादाबद्दल झीरो टोलरन्सची भूमिका असून यापुढील काळात भारत याविरुद्ध सर्वशक्तीने लढत राहील अस जगाला समजावून देणार आहोत अस खासदार सुप्रिया सुळे यांनी यावेळी बोलताना सांगितल.

## डॉ एस जयशंकर

पहलगाम हल्ला हा दहशतवादी हल्ला होता, केवळ काश्मीरसाठी नेहमी होत असलेला भारत आणि पाकिस्तानमधील संघर्ष नव्हता अशी ठाम भुमिका परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांनी काल डेन्मार्कमध्ये मांडली. डॉ. एस जयशंकर नेदरलँड्स, डेन्मार्क आणि जर्मनीच्या अधिकृत दौऱ्यावर आहेत. यावेळी कोपनहेगनमधील एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत पहलगाम हल्ल्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

## हावर्ड

अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स राज्यातील एका न्यायालयाने आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी हार्वर्ड विद्यापीठाचे प्रमाणपत्र रद्द करण्याच्या ट्रम्प प्रशासनाच्या आदेशाला तात्पुरती स्थगिती दिली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयव्ही लीग शाळेवर केलेल्या हल्ल्यानंतर, गृह सुरक्षा विभागाने (DHS) हार्वर्डचे स्टुडंट अँड एक्सचेंज व्हिजिटर इन्फॉर्मेशन सिस्टम वापरण्याचे प्रमाणपत्र रद्द केले होते. त्यानंतर एका दिवसात न्यायालयाने हे निर्देश दिले.

## सर्वोच्च

सर्वोच्च न्यायालयाने भारत तिबेट सीमा पोलीस दल, सीमा सुरक्षा दल, सीआरपीएफ, सीआयएसएफ आणि एसएसबीसह सर्व केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांमध्ये (सीएपीएफ) सहा महिन्यांच्या आत कॅडर पुनरावलोकन करण्याचे निर्देश दिले आहेत. हे पुनरावलोकन 2021 साठी नियोजित होता परंतु तो पुढे ढकलण्यात आला आहे. न्यायमूर्ती अभय ओक आणि उज्जल भुयान यांच्या

खंडपीठाने कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाला गृह मंत्रालयाकडून कॅडर रिव्ह्यू आणि विद्यमान सेवा नियम आणि भरती नियमांच्या पुनरावलोकनासंदर्भात कृती अहवाल मिळाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत योग्य निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. आयपीएस प्रतिनियुक्ती रद्द करण्यासाठी कार्यान्वित नसलेला सुधारणा निधी, कॅडर रिव्ह्यू, या सुरक्षा दलांची पुनर्रचना आणि भरती नियमांमध्ये सुधारणा करण्याची मागणी करणाऱ्या अनेक याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने हे निर्देश दिले.

**इराण-अमेरिका**

अमेरिका आणि इराण यांच्यातील अणुउर्जा संदर्भातील चर्चेचा पाचवा टप्पा इटलीतील रोम इथं सुरू आहे. अमेरिकेने तेहरानवर लादलेले काही आर्थिक निर्बंध उठवण्याच्या बदल्यात इराणचा अणुकार्यक्रम मर्यादित करण्यासंदर्भात ही चर्चे होत आहे. अमेरिकेचे मध्य पूर्व राजदूत स्टीव्ह विटकॉफ आणि परराष्ट्र खात्याचे धोरण नियोजन संचालक मायकेल अँटोन अमेरिकेचे प्रतिनिधित्व करत आहेत, तर ओमानचे परराष्ट्र मंत्री बद्र अल-बुसैदी वाटाघाटींमध्ये मध्यस्थी म्हणून चर्चेत सहभागी झाले आहेत.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, सनरायझर्स हैदराबादने काल लखनौ इथं झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू चा 42 धावांनी पराभव केला. 232 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, आरसीबीचा संघ 19 षटकं 5 चेंडूत 189 धावांवरच गारद झाला. 14 व्या षटकापर्यंत आरसीबीची चुरशीची लढत सुरु होती. मात्र त्यांनी अखेरचे सात बळी केवळ 16 धावांत गमावले. सनरायझर्सकडून कर्णधार पॅट कमिन्सने 3 बळी घेतले, तर एशान मलिंगाने 2 बळी घेतले. आज पंजाब किंग्जचा सामना दिल्ली क्रपिटल्स बरोबर जयपूर इथं होणार आहे, दोन्ही संघ आधीच स्पर्धेतून बाहेर पडले असल्याने, या सामन्याचा प्लेऑफच्या शर्यतीवर कोणताही परिणाम होणार नाही.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पाऊस दोन दिवसांत केरळमध्ये दाखल होण्यास अनुकूल वातावरण तयार झालं असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. अरबी समुद्राच्या दक्षिण आणि मध्यपूर्व भागांवर कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. केरळमधील सहा जिल्ह्यांतील तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे राज्यात नैऋत्य मान्सूनची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्रिशूर, मलप्पुरम, कोझिकोड, वायनाड, कन्नूर आणि कासारगोड तसंच पठाणमथिट्टा, इडुक्की आणि वायनाड या डोंगराळ प्रदेशांसह इतर नऊ जिल्हयांमधेही जोरदार पावसाची शक्यता आहे. आज पश्चिम राजस्थान, दक्षिण कोकण, आणि कर्नाटक, मध्य महाराष्ट्र आणि गोव्यात तसंच गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगडच्या काही भागात मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार